पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे कार्यालय,
चव्हाण नगर, पाषाण रोड, पुणे 411 008
दूरध्वनी क्रमांक 020- 25657878 फॅक्स क्र. 020- 25674641
ई मेल sp.pune.r @mahapolice.gov.in संकेतस्थळ
www.puneruralpolice.gov.in

निविदा जाहिरात - नवीन कामे : वर्ष २०२५-२०२६

जा.क्र. नोंशा/प्रबंधक/कोरेगाव भिमा २०२६ /२०२५ पुणे, दिनांक /१२/२०२५

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण या आस्थापनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षी दिनांक ०१/०१/२०२६ रोजी मौजे पेरणे फाटा, ता- हवेली फाटा, ता- हवेली, जि- पुणे येथे पार पडणाऱ्या कोरेगाव भिमा विजयस्तंभ शौर्य दिन साजरा करण्याकरिता प्रशासकीय सोयीसाठी निविदा पध्दतीने पुरवठादार/ निविदाकार यांचे पुढील कामकाजाची किमान दरात सेवा उपलब्ध करून घेणेकामी बंद लिफाफ्यात निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा क्रमांक	कामाचे नाव	अंदाजित पुर्व गणित रक्कम रू.
SPPUNER/ DRON /2025_2	ड्रोन कॅमेरा ०६ नग सेवा माडेतत्वावर उपलब्ध करून देणेबाबत..	1,20,000/-

महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस २०२१/प्र.क्र. ८/उद्योग-४, दिनांक ०७ मे, २०२१ अन्वये दरपत्रकाचे आधारे वरील सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार आहे.

तरी सदर दरपत्रके/ निविदा व स्विकृती उघडण्याची कार्यवाही कालावधी हा पुढीलप्रमाणे राहील.

निविदा फॉर्म/ दरपत्रके सादर करणेची दिनांक	-	दिनांक २२/१२/२०२५ सकाळी १०.३० वा ते दिनांक २६/१२/२०२५ दुपारी १२.०० वाजेपर्यत.
निविदा फॉर्म/ दरपत्रके स्विकृतीचा अंतिम दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यत
निविदा फॉर्म/ दरपत्रके उघण्याचा दिनांक	-	२६/१२/२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता (शक्य झाल्यास)

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/ शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असुन सदर कामांचे निविदा संच www.puneruralpolice.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

ब) निविदा संच हा शेवटच्या दिवशी प्राप्त न झाल्यास सेवा पुरवठादार/ ठेकेदारांची पुनश्च नव्याने निविदा जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी अंदाजित पुर्व गणित रक्कम दर्शविल्याप्रमाणे लिफाफ्यामध्ये रक्कम कमी दराने रेट कोट करावयाचा आहे. दर्शविलेल्या रक्कमेपेक्षा जादा दराने रेट कोट करण्यात आलेली निविदा बाद समाजवण्यात येईल.

क) महत्वाची सूचना :- सदर कार्यालय कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अत्यंत महत्वाचे काम करीत असल्यामुळे निविदा उघडणेची तारीख व वेळ कधीही बदल / रद्द / पुढे ढकलण्यात येवू शकते.

ड) सदर निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबधितानी वेबसाईटला भेट देवुन लक्ष दयावे. मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी राखुन ठेवलेले आहेत.

इ) अनुदान अभावी निविदा रदद झाल्यास निविदाकार यांनी सादर केलेली निविदा शुल्क/सादर कागदपत्रे परत करणेबाबत कार्यालय कसल्याही प्रकारची हमी देत नाही.

ई) निविदाकार यांनी बंध लिफाफ्यामध्ये दरकोटेशन लेटर हेड वर दयावे तसेच या निवीदेत सादर करण्यात आलेला (नमुना फॉर्म-१) भरून सादर करणे अनिवार्य राहील. तसेच निविदाकार एल-१ ठरल्यावर नमुना फॉर्म-१ मधील सर्व कागदपत्रांचा संच कार्यालयानी पुरवठा आदेश दिल्यानंतर जमा करावे लागेल.

जी) तरी तांत्रिक दृष्टया पात्र असणा-या निविदाकार दरपत्रके बंद पाकिटात खरेदी समिती समक्ष सादर करणेची दक्षता घ्यावी.

मा. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांचे मान्यतेने

(दिलीप शिंदे)
पोलीस उप-अधीक्षक (मुख्या.).,
पोलीस अधीक्षक कार्यालय, पुणे ग्रामीण.

प्रति, सर्व मेसर्स,

प्रत प्रसिध्दीकामी :- पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण

(नमुना फॉर्म-१)

१	निविदाकार कंपनीचे पूर्ण नाव व पत्ता दूरध्वनीसह	
२	निविदाकार कंपनीचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक (Company incorporation / Shop Act No.)	
३	निविदाकार कंपनीचे / मालकाचे PAN Card / TAN Card. क्रमांक	
४	निविदाकार कंपनीचे GST Registration Certificate. क्रमांक	
५	निविदाकार कंपनी किंवा त्यांचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक यांच्यावर कोणत्याही सरकारी किंवा निमसरकारी कार्यालयामध्ये फ़सवणुकीची / गैरप्रकाराची किंवा भ्रष्टाचाराची कोणतीही चौकशी चालू / प्रलंबित नसली पाहिजे. तसेच निविदाकार कंपनीचा समावेश सरकारी काळ्या यादीत नसला पाहिजे. अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधनकारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०१)	
६	निविदाकार कंपनीचे मालक / संचालक / भागीदार व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर / नोंदणीकृत असल्यास सदर कंपनी व मूळ कंपनी अशा दोन किंवा जास्त निविदा सादर करता येणार नाहीत. तसेच अशा प्रकारच्या दोन किंवा जास्त निविदा एकाच वेळी व एकाच निविदेसाठी इतर कोणत्याही शासकीय कार्यालयात सादर केल्या असतील व तसे करुन मूळ कंपनीच्या नावावर काम घेतले असेल किंवा नसेल, अशा कंपन्यांना साखळी करुन (Ring) निविदा प्रक्रिया केली, असे संबोधले जाईल व अशा कंपन्यांच्या निविदा रद्द करण्यात येतील. निविदा सादर करणाऱ्या सर्व निविदाकारांनी स्वतःचे प्रतिज्ञापत्र सोबत जोडलेल्या नमुन्या प्रमाणे **कंपनीच्या लेटर हेडवर** देणे बंधन कारक आहे. (सोबत नमुना परिशिष्ट - ०२)	
७	(उदा. 2022-23, 2023-24, 2024-25) प्रपत्र-३ प्रमाणे चार्टर्ड अकाउंटंट यांचे प्रमाणित केलेले मागील 3 आर्थिक वर्षांतील आयकर रिटर्न आणि UDIN क्रमांकासह चार्टर्ड अकाउंटंट मे प्रमाणित केलेले	

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक

(कंपनीचा शिक्का)

***** कंपनीच्या लेटर हेडवर*****

(१) परिशिष्ट -1

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ---------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ----------पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2026 च्या अनुषंगाने साधन सामुग्री/ सेवा पुरवठा** करणेबाबत निविदा---------- ही साधन सामुग्री / **सेवा पुरवठा** ----------नग संख्या---------- पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------- नावाने भरत आहोत. सदर सेवा कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त कालावधी दिनांक 30/12/2025 ते दिनांक 02/01/2026 पर्यत आम्ही सेवा देणेस कटीबध्द आहे.

मी / आम्ही तसेच माझी कंपनी यांचे विरोधात कोणत्याही सरकारी कार्यालयामध्ये निविदा भरण्याच्या दिनांक- 15/12/2025 रोजी पर्यंत कोणतीही गैरप्रकार, अफरातफर गैरव्यवहार, फसवणूक तसेच भ्रष्टाचार या विषयी कोणतीही चौकशी चालू नाही किंवा प्रलंबित नाही.

तसेच अशा प्रकारची कोणतीही चौकशी माझे / आमचे जवळचे नातेवाईक (आई / वडील / बायको / नवरा / भाऊ / बहीण) यांचे विरोधात सुध्दा चालू नाही. .

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार /

संचालक

***** कंपनीच्या लेटर हेडवर*****

(२) परिशिष्ट - 2

(मालकाचे / भागीदार / संचालक यांचे प्रतिज्ञापत्र)

प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही ---------- (मालकाचे / भागीदारांचे / संचालकांचे नाव व पत्ता) ---------- पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयामध्ये / **आस्थापनेवर कोरेगाव भिमा बंदोबस्त सन 2026 च्या अनुषंगाने साधन सामुग्री / सेवा पुरवठा** करणेबाबत निविदा---------- ही साधन सामुग्री / **सेवा पुरवठा** ----------नग संख्या---------- पुरवठा करणेकामी (निविदाकार कंपनीचे नाव व पत्ता) ---------- नावाने भरत आहोत.

मी / आम्ही सदर कंपनीचे संचालक असून आमच्या संचालकांच्या जवळच्या नातेवाईक (मालक / संचालक व त्यांचे जवळचे नातेवाईक उदा. आई, वडील, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी) यांच्या नावावर दोन किंवा जास्त समान व्यवसाय करणाऱ्या स्वतंत्र अथवा भागीदारीमध्ये वेग वेगळ्या कंपन्या रजिस्टर आहेत / नाहीत. (असल्यास त्यांची नावे देण्यात यावीत.)

तसेच सदर दोन किंवा त्यापेक्षा जास्त असणाऱ्या कंपन्यांनी मिळून कोणत्याही एका शासकिय निविदा प्रक्रियेमध्ये एकत्र सहभाग नोंदविलेला नाही. तसेच अशा प्रकारचे कोणतेही शासकीय काम घेतलेले नाही. अशा प्रकारची तक्रार आढळून आल्यास मला व माझ्या कंपनीला सदर निविदा प्रक्रियेमधून रद्द करण्यात येईल, याची मला जाणीव आहे.

सही

निविदाकार कंपनीचे मालक / भागीदार / संचालक